



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २६ जून २०२५ | अंक १८९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु





# शेतीची वाटणी एकदम फ्री! दस्त नोंदणी शुल्क माफ, राज्यातील लाखो शेतकऱ्यांना फायदा

राज्यातील शेतकऱ्यांसाठी आनंदवार्ता आहे. राज्य शासनाने यापूर्वीच शेत जमिनींच्या वाटप पत्राच्या दस्तावर कोणतेही नोंदणी शुल्क न आकारण्याचा निर्णय घेतला होता. गेल्या महिन्यात या निर्णयाची घोषणा झाली होती. आता त्याविषयीची अधिसूचना राज्य सरकारने प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला आहे. शेतजमिनीच्या वाटणीनंतर दस्त नोंदणीसाठी 30 हजार रुपयांच्या घरात शुल्क आकारले जाते. हे शुल्क आता माफ झाले आहे. शेतकऱ्यांना कागदपत्रांच्या खर्चा व्यतिरिक्त सरकारी शुल्काची झळ बसणार नाही. त्यामुळे जमिनी वाटपाची रखडलेली कामे जलदगतीने मार्गी लागतील.

एका महिन्यापूर्वीच शिक्कामोर्तब राज्य




मंत्रिमंडळाने जमीन वाटप दस्तनोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय या मे महिन्याच्या अखेरीस घेतला होता. महसूल विभागाने हा निर्णय घेतला होता. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याविषयीची माहिती दिली होती. विभागाच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाने तात्काळ मान्यता दिली होती. यामुळे शेती वाटप पत्रावरील दस्त नोंदणीसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही हे स्पष्ट झाले होते. राज्यात कृषक आणि अकृषक मिळकतीसाठी नोंदणी शुल्क सारखेच आहे. एकूण मूल्याच्या 1 टक्क्यांपर्यंत साधारणतः 30 हजारांपर्यंत हे शुल्क आकारण्यात येते. मुंद्राक शुल्क 100 रुपये असले तरी नोंदणी शुल्क अधिक होते. आता हे शुल्क माफ करण्यात आले आहे. याविषयीची अधिसूचना सरकारने प्रसिद्ध केली आहे. या निर्णयाची आता अंमलबजावणी सुरू झाली आहे. राज्यातील लाखो शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे.

## सरकारच्या तिजोरीवर भार

या निर्णयामुळे सरकारच्या महसूलात दरवर्षी 35 ते 40 कोटींची घट येण्याची शक्यता आहे. सरकारच्या तिजोरीत आवक घटेल. तर दुसरीकडे शेतकऱ्यांची शेती वाटपावरून होणारी भांडणं आणि रखडलेली नोंदणी या जाचातून सुटका होईल. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 85 नुसार शेत जमिनीचे वाटप करताना मोजणी करावी लागते. त्यावेळी वाटप दस्तासाठी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क द्यावे लागते. मुद्रांक शुल्काचा भार अत्यल्प आहे. पण नोंदणी शुल्क 30 हजारांच्या घरात होते. आता हे शुल्क माफ झाल्याने शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला आहे.

# प्रभारी कार्यकारी अभियंता आंधळे रंगेहात पकडला

बीड /प्रतिनिधी बीड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे आणि वरिष्ठ लिपिक किरण कुमार हिवाळे या दोघांना ८० हजार रुपयांची लाच घेताना बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी अटक केली. या कारवाईमुळे ग्रामीण पाणी पुरवठा आणि बीड जिल्हा परिषदेत खळबळ उडाली आहे. बीड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामध्ये मोठ्या प्रमाणात लाचखोरी सुरू असल्याच्या अनेक घटना यापूर्वी घडलेल्या आहेत. सध्या बीड जिल्ह्यात जलजीवन मिशनची कामे सुरू आहेत. या कामाच्या टेंडर प्रक्रियेपासून ते फायनल बिल काढण्यापर्यंत कार्यकारी अभियंता असो की यापूर्वीचे गेल्या तीन वर्षातील कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता एवढेच काय पण टेंडर क्लर्क पासून ते शिपायापर्यंत अनेक जण वादातीत आहेत. मंगळवार दिनांक २५ रोजी दुपारनंतर प्रभारी कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे लिपिक किरण हिवाळे या दोघांनी ८० हजार रुपयांची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांना रंगहात पकडले. सदर कारवाई संदीप आटोळे, पोलीस अधीक्षक, लाप्रवि छत्रपती संभाजी नगर, मुकुंद आघाव, अपर पोलीस अधीक्षक लाप्रवि छत्रपती सोपान चिट्टमपल्ले, पोलीस निरीक्षक समाधान कवडे, पोलीस निरीक्षक राहुलकुमार भोळ, सपोउपनि सुरेश सांगळे, पोलीस अंमलदार मच्छिंद्र बीडकर, पांडुरंग काचगुडे, अनिल शेळके अविनाश गवळी, अमोल खरसाडे संतोष राठोड प्रदिप सुरवसे, अंबादास पुरी यांनी कारवाई केली आहे. पाणी पुरवठा विभागात अनेकांची बिले काढण्याचे काम सदर तक्रार दिल्याचे समजते.बीड जिल्हा परिषदेच्या बहुचर्चित पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यावर लाचेची कारवाई झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

# चौसाळा येथे गुरूवारी संत मुक्ताबाई पालखीचे आगमन

चौसाळा (प्रतिनिधी) प्रतिवर्षा प्रमाणे याहीवर्षी श्री संत मुक्ताबाई पालखी सोहळा गेल्या कित्येक वर्षापासून बालाघाटावरील चौसाळा नगरीतून मार्गस्थ होतो ही वारकरी सेवा कै. दिगंबर तात्या शिंदे यांच्यापासून सुरू केलेली आहे त्यानंतर त्यांचे नातू कै. संजय (दादा )शिंदे यांनी सुरू ठेवली व त्यांच्या पश्चात आता विठ्ठल जनार्दन शिंदे हे या दिंडीचे भव्य दिव्य असे वाजत गाजत दिंडीचे स्वागत चौसाळा नगरीत




करतात ही दिंडी दिनांक २६ जून २०२५ रोजी चौसाळा शहरात दाखल होत असुन याची जय्यत तयारी सुरू आहे तरी चौसाळा व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी गुरूवार दि. २६ जून २०२५ रोजी मुक्ताबाईच्या पालखी सोहळ्याच्या महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी मुक्ताईनगर चौसाळा या ठिकाणी उपस्थित राहावे असे आवाहन समर्थ विठ्ठलराव शिंदे पाटील यांनी केले आहे

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन



बीड, दि.२५ :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिवस २६ जून दरवर्षी सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्यात येतो. सदर सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड या कार्यालयाच्या वतीने दि. २६ जून, २०२५ रोजी सकाळी १.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य कार्यक्रमापूर्वी दि. २६ जून, २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा ते सामाजिक न्याय भवनापर्यंत समतादिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर समता दिंडीचा मार्ग सुभाष रोड, शिवाजी महाराज पुतळा ते सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड असा असुन सामाजिक न्याय भवनात समता दिडीचा समारोप होईल. तसेच मुख्य कार्यक्रम सकाळी ११.०० वाजता सुरु होईल. सदर सामाजिक न्याय दिनाच्या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रदिप भोगले यांनी केले आहे.

*****

# दासखेडच्या आरोग्य केंद्रात डॉ.हरिदास शेलार यांच्या प्रयत्नातून वृक्षलागवड! सन पावर प्रायव्हेट लिमिटेड यांचा उपक्रम ; पर्यावरण संरक्षण सप्ताह उत्साहात

पाटोदा प्रतिनिधी पर्यावरण संरक्षण सप्ताह उत्साहात मान्यवरांची उपस्थिती पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे संन पावर प्रायव्हेट लिमिटेड दि. २५ जून रोजी फळ झाडें व फुले लागवड करून पर्यावरण संरक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी कंपनीची वतीने झाडं लागवड करण्यात आली. यावेळी प्रकल्प समन्वयक मोहन गाडे मार्गदर्शन केले. वन हक्क प्राप्त गावात शाश्वत उपजीविका आणि पर्यावरण सुरक्षा प्रकल्प राबवला जात आहे.



निसर्गाचे संरक्षण आणि संगोपन करणे हे आजच्या काळाची गरज आहे. प्रत्येक व्यक्तीने किमान आयुष्यात १०० झाडे लावायला पाहिजे, परंतु आजच्या काळात हे चित्र दिसत नसून पर्यावरणाचे महत्व फार कमी दिसून येते. त्यामुळे नागरिकांकडून पर्यावरण संरक्षण आणि संगोपन व्हावे. शाश्वत असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्ती पर्यावरणाचे महत्त्व लोकांना कळावे, म्हणून संन पावर प्रायव्हेट लिमिटेड अंतर्गत शाश्वत उपजीविका आणि पर्यावरण सुरक्षा हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. पर्यावरण सप्ताह वन बीज वनस्पती फुले लागवड व पर्यावरण हे आपल्या सभोवतालचे नैसर्गिक जग आहे त्यात हवा पाणी जमीन जंगल आणि सर्व सजीवांचा समावेश आहे. असे प्राणी पक्षी नैसर्गिक संसाधनाचा उपयोग करून आपल्या उपयोगिता कशा वाढवू शकतो. वन बीज बियाण्यांचे महत्त्व यावेळी नागरिकांना पटवून देण्यात आले. जसे की, बिबा हे एक औषधी असून याचा उपयोग गंभीर आजारासाठी होतो.या वेळी. उपस्थित.डॉ शरयू पडोळे. डॉ.युवराज राठोड.सय्यद कादर . महोन गाडे सन पावर प्रायव्हेट लिमिटेड . डॉ हरिदास शेलार.नितेश कुमार राख. गणेश मस्के.राहुल चव्हाण. शेख मिनाज ताई .गणेश बामदळे.लखन पवार.गणेश सरडे. अश्विनी सोनवणे. शुभम राख. तसेच सामाजिक कार्यकर्ते अशोक कोकाटे. दत्ता कोकाटे. किरण कोकाटे. बाबु पवळ हे उपस्थित होते.*****

# चक्क हातपम्प घातला गटार कामात
## संबंधित गुत्तेदार व त्यांची बिले काढणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार करणार – उल्हास गिराम

बीड :(प्रतिनिधी ) बीड नगरपालिकेचा गलथान कारभार. मागील चार वर्षांपासून नगरपालिके वर प्रशासक आहे. या काळात पालिका प्रशासनाने मनसोक्त हात साफ करून घेतला. राजीव गांधी चौकातुन शासकीय आयटीआय च्या मागील रस्त्यावर नव्याने रस्ता व नाली काम झाले. या मार्गांवर असलेला हातपम्प (हापसा) बाजूला काढणे अपेक्षित होते. परंतु याचे गांभीर्य ना नगर पालिकेला ना संबंधित गुत्तेदाराला. चक्क हातपम्प गटार कामात घातला. संबंधित गुत्तेदार व त्यांची बिले काढणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार करणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

गटाराच्या एकदम मधोमध हातपम्प असल्यामुळे एक बाजु पूर्णपणे कोंदली आहे. सुरळीत गटाराचे पाणी पुढे प्रवाहित होत नाही. गटार साफ करतांना संबंधित



सफाई कामगार, संबंधित स्वच्छता निरीक्षक यांच्या लक्षात आले नसेल का? पालिका प्रशासनाने या कामाची गुणवत्ता तपासली नसेल का? बिले निघण्या आगोदर संबंधित कामाची नियमावली, निकष, कार्य पद्धत, गुणवत्ता या सर्वांची पायमल्ली झाली असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

# लिंबागणेश येथील पाणंद रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, महावितरण विविध मागण्यांसाठी आ.संदिप क्षीरसागर यांना निवेदन :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:-( दि.२५ ) बीड तालुक्यातील लिंबागणेश गावातील वस्तीवरील पाणंद रस्त्यांची दुरावस्था असुन पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून शालेय मुलांच्या शाळा,दवाखाना,बाजारहाट, दुधदुभती तसेच खत,बि बियाणे आणि शेतीमालाला वाहतुक करण्यासाठी अडचण येत असुन ग्रामस्थांनी लोकसहभागातून रस्ते करण्यास सुरुवात केली असुन प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राची ईमारत जीर्ण झाली असुन पावसाळ्यात छताला गळती लागली असुन रूग्णांची गैरसोय होत आहे त्यामुळे मुख्य ईमारत व अधिकारी आणि कर्मचारी यांची मोडकळीस आलेल्या निवासस्थानांची दुरुस्ती करण्यात यावी. लिंबागणेश येथील ३३ केव्ही उपकेंद्र याठिकाणी वर्षभरापासून उप अभियंता पद रिक्त असल्याने अडचणी येत असुन तातडीने कायमस्वरूपी पदनियुक्ती करण्यात यावी.तसेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी संरक्षक भिंत बांधण्यात यावी. आदी मागण्यांचे निवेदन आज दि.२५ बुधवार रोजी ङ्गआमदार आपल्या गावी, आपल्या दारी कार्यक्रमाच्या निमित्ताने बेलेश्वर मंदिर बेलगाव याठिकाणी आलेल्या बीडचे आ.संदिप क्षीरसागर यांना सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिले. निवेदनातील मागण्यांबाबत सकारात्मक दर्शवत आ.संदिप क्षीरसागर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सुचना केल्या.सविस्तर माहितीस्तव

बीड तालुक्यातील ग्रामस्थांच्या शासकीय कामातील अडचणी सोडविण्यासाठी आणि सामान्य ग्रामस्थांशी संवाद साधण्यासाठी प्रशासकीय विभागातील अधिकाऱ्यांसोबत बीड तालुक्यातील लिंबागणेश गणातील गावांची बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे आज दि.२५ बुधवार रोजी आ.संदिप क्षीरसागर यांनी ङ्ग आमदार आपल्या गावी, आपल्या दारीङ्ग या विशेष मोहिमेंतर्गत बैठक कार्यक्रम आयोजित




करण्यात आला होता.या कार्यक्रमात स्थानिक ग्रामस्थांच्या समस्यांचे निराकरण करण्यावर भर देण्यात आला. या कार्यक्रमात आ. संदिप क्षीरसागर यांनी लिंबागणेश गणातील ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि तात्काळ निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.ङ्ग आमदार आपल्या गावी, आपल्या दारीङ्ग हि संकल्पना गावागावांतील लोकांच्या समस्या थेट त्यांच्या दारी जाऊन सोडविण्यासाठी आणि लोकांशी संवाद साधण्यासाठी असुन शासकीय योजनांचा लाभ गरजुंपर्यंत पोहोचवणे आणि प्रशासकीय कामातील अडथळे दूर करणे हा मुख्य उद्देश असल्याचे आ.संदिप क्षीरसागर यांनी सांगितले.या उपक्रमाला लिंबागणेश गणातील सर्वसामान्य लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.अशा प्रकारच्या मोहिमांमुळे शासकीय योजनांचा लाभ थेट लोकांपर्यंत पोहोचत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.या बैठकीस तहसील, पंचायत समिती, महावितरण,कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, लघुपाटबंधारे विभाग आदी प्रशासकीय विभागाचे अधिकारी आणि लिंबागणेश गणातील सरपंच , उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. आ.संदिप क्षीरसागर यांच्यासमवेत माजी आ.सय्यद सलिम, बीड जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार गट राजेंद्र मस्के, शेषेराव तांबे, आरूण जगताप आदी उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २६ जून २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## एसटीची सुधारणा करताना प्रवासी केंद्रस्थानी असावा

गाव तेथे रस्ता आणि रस्ता तेथे एसटी धावायला हवी, असे गेल्या अनेक दशकांपासून राज्याच्या दुर्गम भागात राहणाऱ्या गावकऱ्यांचे स्वप्न असते. राज्यातील सर्वसामान्यांना परवडणारी एसटीची सेवा आज शहरापासून ग्रामीण भागापर्यंत अव्याहतपणे सुरू आहे. पण, काळाच्या या चक्रात एसटी महामंडळाला आर्थिक विंवचनेतून जावे लागले. मप्रवाशांच्या सेवेतफ हे एसटीच ब्रीदवाक्य आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतील प्रत्येकाला प्रवासाचा आधार म्हणजे आपली लालपरी वाटते. संकटकाळात एसटी अशी कशी उपयोगी पडते याचा प्रत्यय मुंबईकरांनाही आला होता. कोरोना काळात मुंबईतील लोकल बंद करण्याचा निर्णय झाला. त्यावेळी बेस्ट बसेसच्या जोडीला एसटी महामंडळाच्या गाड्या या मु ंबईतील गल्लीबोळातून धावत होत्या. औरंगाबाद, जळगावमधील वाहनचालक हे आपले गाव सोडून मुंबईकरांच्या सेवेत होते. त्यामुळे मुंबईकरांना कोरोना काळात नोकरीवर जाण्यासाठी एसटी बसेसचा उपयोग झाला होता, याची जाणीव मुंबईकरांना आहे; परंतु हीच सेवा देणारी एसटी अडचणीत का आहे, हे जाणून घेण्याची उत्सुकता मुंबईसारख्या शहरामध्ये राहणाऱ्या नागरिकांनासुद्धा आहे. एसटी महामंडळाची आर्थिक सद्यस्थिती दर्शवणारी एक श्वेतपत्रिका सोमवारी जाहीर झाली. एसटीचे एकूण महसुली उत्पन्न, खर्च, कर्ज आणि देयके किती आहेत? याबाबतचा आढावा घेणारी ती श्वेतपत्रिका होती. या श्वेतपत्रिकेत ४५ वर्षांचे अवलोकन करण्यात आले आहे. या ४५ वर्षांपैकी फक्त ८ वर्षेच महामंडळाला काही प्रमाणात नफा झाल्याचे दिसून आले आहे. उर्वरित सर्व वर्षात मोठ्या प्रमाणात तोटा झाल्याचे समोर आले आहे, त्यामुळे हा तोटा का झाला? यावर उपाययोजना काय आहे, याबाबत श्वेतपत्रिकेत नमूद केले आहे. एसटी महामंडळाने पुढील वाटचालीसाठी काही महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविलेल्या आहेत. अपघात कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. प्रवासी व मालमत्तांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही प्रणाली बसवली जाणार आहे. सध्या सवलत नसलेल्या लांब पल्ल्याच्या प्रवाशांसाठी भाड्यात सवलत देण्याचा विचार आहे. तसेच कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबवण्याची योजना देखील आहे. त्याचप्रमाणे, एसटी महामंडळाच्या ताफ्यात दरवर्षी ५ हजार नवीन बसेसचा समावेश करणे, एसटी ताफ्यात भाडेतत्त्वावरील हायटेक व्होल्वो बसेसचा समावेश करणे, एसटी महामंडळाच्या जागांवर इंधन पुरवठादार कंपन्याकडून महसुली भागीदारी तत्त्वावर खासगी वाहनांसाठी किरकोळ इंधन विक्री केंद्र सुरू करणे, एसटी महामंडळाच्या जागांचा बिओटी/पीपीपी तत्त्वावर विकास करणे, प्रवासी सोयी आणि सुविधा निर्माण करणे, उत्पन्न वाढीसाठी लक्षांक निश्चित करणे, आदी उपाययोजनांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, एसटी महामंडळाने तोट्याची पाच महत्त्वाची कारणे या श्वेतपत्रिकेत सांगितली आहेत. त्यात, राज्य परिवहन महामंडळाकडे बसेसची कमतरता असल्याचा मुद्दा नमूद केला आहे. उपलब्ध असलेल्या बसेसचे आयुर्मान अधिक असणे आवश्यक आहे. अनिवार्य व तोट्यातील चलन, अनियमित भाडेवाढ, अवैध वाहतूक ही एसटी तोट्यात जाण्यास कारणीभूत ठरली आहे. श्वेतपत्रिकेनुसार, महसूल वाढीच्या काही उपाययोजनांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामध्ये उच्च दर्जाच्या व्होल्वो बस भाडेतत्त्वावर घेतल्या जाणार आहेत. महामंडळाच्या मालकीच्या जागांवर खासगी वाहनांसाठी इंधन पंप उभारण्यात येणार असून, त्यासाठी इंधन पुरवठादारांशी महसूल वाटप करार केले जाणार आहेत. तसेच, महामंडळाच्या मालमत्ता बीओटी किंवा पीपीपी मॉडेलवर विकसित केल्या जाणार आहेत. सी-कॅटेगरी मार्गांचे बी-कॅटेगरीत व बी-कॅटेगरीचे ए-कॅटेगरीत रूपांतर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्रवासी सुविधांचा दर्जा उंचावणे आणि महसूल वाढीसाठी ठोस उद्दिष्टे निश्चित केली जाणार आहेत. एसटी महामंडळाकडे पूर्वी कामगार वर्ग मोठा होता. मात्र आता कामगार वर्ग ७९ हजार आहे. आधी १८ हजार ५०० गाड्या होत्या. पण नंतर काही बसगाड्या मोडकळीस आल्या. गळक्या आणि तुटक्या बसेस रस्त्यावर चालत होत्या. गेल्या १० ते १२ वर्षांत हा ग्राफ कमी होत गेला आहे.

# लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर अडीचशे वर्षांनी कोल्हापूर संस्थानातून शाहू महाराजांच्या रुपाने सत्तेचा उपयोग लोककल्याणासाठी करणारा एक दुसरा महापुरुष उदयाला आला. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात गोरगरिबांसाठी, दीनदलीतांसाठी, सकल बहुजनांसाठी अनेक सुधारणा केल्या आणि पुरोगामी विचारांचा सतत पाठपुरावा केला. त्यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात आणि पर्यायाने भारतात समाज सुधारणेला चालना मिळाली.

आजच्या कोल्हापूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असलेल्या कागलच्या घाटगे परिवारात जयसिंगराव उर्फ आबासाहेब व राधाबाई या दाम्पत्याच्या पोटी २६ जून १८७४ रोजी यशवंतराव हे पुत्ररत्न जन्माला आले. हेच यशवंतराव पुढे कोल्हापूरच्या गादीचे राजे राजर्षी शाहू छत्रपती महाराज होत. घाटगे घराण्याचे छत्रपती शिवाजी म हाराजांच्या काळापासून स्वराज्यात योगदान होते व नंतर छत्रपतींच्या घराण्याशी अनेक पिढ्यांचे नातेसंबंध होते. यशवंतरावांचे वडील जयसिंगराव उर्फ आबासाहेब यांचे बालपण छत्रपतींचा भाचा या नात्याने कोल्हापूरच्या राजवाड्यात मोठ्या कौतुकात गेले होते. कागलच्या घाटगे घराण्यातील पूर्वज हे आदिलशाही दरबारातील एक नामांकित सरदार घराणे होते. आपल्या शौर्याच्या बळावर आदिलशहाकडून सर्जे राव हा किताब या घराण्याने पूर्वी प्राप्त केला होता. त्यामुळे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील उत्तम अशा कार्यकर्तृत्वाचा वारसा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना आपल्या कुटुंबातूनच लाभला होता. त्यामुळे पुढे एक राजा म्हणून सामाजिक आणि राजकीय अशा दोन्ही मार्गामध्ये वाटचाल करत असताना क्रांतिकारक अशा निर्णयांच्या माध्यमातून शाहू महाराजांनी आपल्या कार्यकर्तृत्वाची अमिट अशी छाप उमटविली. सत्तेचा उपयोग समाजप्रबोधन, समाजपरिवर्तन आणि समाज सुधारण्यासाठी केला. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराज आणि क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले यांचे कृतिशील वारसदार म्हणून छत्रपती शाहू महाराजांकडे पाहिले जाते.

विद्याहीन, धनहीन, सत्ताहीन आणि दिशाहीन बहुजन समाजाच्या दुःखाला वाचा फोडणारा पहिला वाली मिळाला तो महात्मा जोतिराव फुले यांच्या रूपाने. बहुजन समाजाच्या दुःख व दैन्याचे मूळ त्यांच्या अज्ञानात व अंधश्रद्धेत आहे आणि या दोन्हींच्या निर्मूलनास शिक्षणाशिवाय दुसरा उपाय नाही हे महात्मा फुले यांच्या



लक्षात आलं आणि त्यांनी त्या दृष्टिकोनातून काम करण्याला प्राधान्य दिले. तोच वारसा पुढे छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी चालवला. महात्मा फुले आणि शाहू महाराज यांच्याच मार्गावरून चालत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा वारसा आणि विचार पुढे नेला आणि स्वातंत्र्यानंतर तो संविधानात उतरवला.

आपणाला मिळालेला राज्याधिकार हा राजवैभव, राजविलास यांचा उपभोग घेण्यासाठी नसून तो रंजल्या गांजल्या प्रजाजणांच्या विशेषता गरीब व अज्ञानी जनतेच्या उद्धारासाठी आहे, अशी राजाच्या उपभोगशून्य स्वामीत्वाची जाण शाहू महाराजांच्या ठिकाणी राज्यारोहणाच्या क्षणापासूनच होती असे लक्षात येते. राज्यारोहणापूर्वी कारभाराच्या प्रशिक्षणाचा एक आत्यावश्यक भाग म्हणून महाराजांकडून त्यांच्या शिक्षकांनी संस्थानच्या सर्व भागांचा दौरा करून घेतला होता. या दौऱ्यात खेड्यापाड्यातील, डोंगराळ मुलखांतील गरीब रयतेची दयनीय अवस्था त्यांनी जवळून पाहिली होती. डोळस नजरेने त्यांनी रयतेच्या दारिद्र्याचे दशावतावर टिपले होते आणि म्हणूनच राज्याधिकार मिळाल्यावर हा राजा राजवाड्याच्या विलासात मग्न न होता आपल्या राज्यात सतत फिरत राहिला, आपल्या रयतेचे दुःख दैन्य त्याची कारणे शोधत राहिला आणि त्यावर उपाययोजना करत राहिला. हे महतकार्य करत असताना त्यांच्यावर अनेक संकटेआली, आरोप झाले, विरोध झाला पण ते थांबले नाहीत. ब्रिटिशांच्या अंमलाखाली काम करत असताना अनेक अडचणी होत्या पण लोकांच्या हितासाठी त्या अडचणी शाहू महाराजांनी लिलया मागे टाकल्या.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे सामाजिक समतेचे प्रणेते मानले जातात. त्यांनी आपल्या संपूर्ण हयातीत जातीभेद व अस्पृश्यता या दोन सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. अस्पृश्यता ही जातीभेदाचेच विकृत स्वरूप असल्याचे त्यांनी अनेकदा जाहीर केले होते. सर्व समाज घटकांना एका प्रवाहात आणण्यासाठी त्यांची अखंड धडपड सुरू होती. शेकडो वर्ष भारतात बहुजन समाज हा शिक्षणापासून वंचित राहिला होता. म हाराष्ट्रही त्याला अपवाद नव्हता. अविद्या म्हणजे शिक्षणाचा अभाव या अविद्येने म्हणजे अज्ञानानेच बहुजन समाजास अधोगतीस नेले आहे, गुलामगिरीच्या गर्तेत ढकलले आहे. त्यातून सुटण्याचा एक जालीम उपाय म्हणजे शिक्षण हे महाराष्ट्रात प्रथम जाणले आणि त्या दृष्टिकोनातून काम केले ते महात्मा जोतिराव फुले यांनी आणि नंतर शाहू छत्रपतींनी याच उद्देशासाठी भगीरथ प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यासाठी वसतीगृहांची चळवळ शाहू महाराजांनी सुरू केली. ती भविष्यामध्ये लोकचळवळ झाली. त्याचबरोबर मुस्लिम बोर्डिंगची स्थापना, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगची स्थापना, मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस, जातवार वसतीगृहे अशा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी मागास बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

काळाला वळण देण्याचे सामर्थ्य असणारे महापुरुष अशी त्यांची त्या काळात ओळख निर्माण झाली होती ती आजही कायम आहे. अनिष्ट प्रथा व परंपरा, रूढी, चालीरीती, खुळचट कल्पना या माध्यमातून होणारं शोषण, पीळवणूक, छळ याला पायबंद बसावा यासाठी विधवा पुनर्विवाह कायदा, आंतरजातीय विवाह कायदा, घटस्फोटाचा व वारसाचा कायदा, पडदा पद्धतीचा निषेध, क्रूरपनाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा, मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा अशा प्रकारचे अनेक काळाला वळण देणारे सुधारणावादी कायदे शाहू महाराजांनी त्या काळामध्ये केले. त्याचबरोबर मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण, सार्वत्रिक पाटबंधारे धोरणाचा जाहीरनामा, त्या काळातील देशातील सर्वात मोठा राधानगरी धरणाचा प्रकल्प, शेतीतील विविध अभिनव प्रयोग, स्थानिक व्यापार व उद्योगधंदे यांना प्रोत्साहन, सहकार तत्वाचे आद्य पुरस्कर्ते, मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी, अनेक कलागुणसंपन्न व ज्ञानसंपन्न व्यक्तींना राजाश्रय, हिंदू मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार, क्षात्रजगद्गुरु पिठाची स्थापना व संस्कृत व तत्वज्ञान यात पारंगत असणारे सदाशिवराव पाटील बेनाडीकर यांची क्षात्रजगद्गुरु म्हणून नेमणूक असे अनेक धाडसी व ऐतिहासिक निर्णय त्यांनी त्या काळामध्ये घेतले. राजकारण, समाजकारण, धर्म, संस्कृती, शिक्षण, शेती, पाणी, उद्योग, व्यापार, सहकार, कला, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रात शाहू महाराजांनी अनमोल योगदान दिले.

राजर्षी शाहू छत्रपती यांच्या जीवनचरित्राकडे पाहिले की आपल्या लक्षात येते की त्यांनी आपली सर्व राज्यसत्ता, राजवैभव लोकांच्या रयतेच्या उन्नतीसाठी खर्ची घातले म्हणूनच त्यांना आपण लोकराजा असे म्हणून गौरवतो. सामाजिक समतेची दृष्टी व शिक्षण प्रसाराची तळमळ असणारा शाहू छत्रपती हा मुलखावेगळा राजा होता. म्हणूनच तो लोकराजा होऊ शकला. हा राजा शेतकऱ्यांमध्ये, कष्टकऱ्यांमध्ये, कामगारांमध्ये, दलितपतितांमध्ये रमत असे त्यांच्यापैकीच एक होऊन जात असे त्यामुळे तो सर्वांना आपला व जवळचा वाटत असे. लोकहितासाठी तळमळीने काम करणारा, काळाच्या पलीकडची दृष्टी असणारा राजा आणि कर्ता सुधारक अशी ओळख निर्माण करणारा हा लोकराजा आपल्या कार्यकर्तृत्वाने इतिहासात अजरामर झाला. दिनांक ०६ मे १९२२ रोजी सकाळी सहा वाजता हा दीन दुबळ्यांचा, दीन दलितांचा, बहुसंख्य बहुजनांचा वाली, कैवारी महाराष्ट्राचा महापुरुष आपल्या लाखो अनुयायांना व चाहत्यांना दुःख सागरात लोटून निघून गेला. आज जयंती निमित्ताने लोकराजा राजर्षी शाहू छत्रपती महाराजांच्या पावन स्मृतीस कोटी कोटी वंदन.

ह भ प संतोष महाराज डोंगरे
जिल्हाध्यक्ष
संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष बीड
मो. ९४२१३३५९४६

## पोलीस निरीक्षक पवार यांच्या हस्ते पुजा करून वारकर्यांना अल्पोपहार व महाप्रसादाचे वाटप

बीड /प्रतिनिधी श्रीसंत मुक्ताईंची पालखी मुक्ताईनगर येथून पंढरपूर कडे रवाना होत असताना दोन दिवसांसाठी बीड शहरात मुक्कामी असते, यावेळी बीड शहरातील भाविक मोठ्या उत्साहात पालखीचे स्वागत करत वारकरी बांधवांच्या सेवेतच विठ्ठलाचे दर्शन करत असतात. बीड शहरातुन पंढरपुरकड े प्रस्थान करते वेळी सामाजिक क्षेत्रातील संकल्प युवा सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने पालखीचे हर्षोल्लासात मध्यवर्ती बसस्थानक समोर स्वागत करण्यात आले. हा पालखी सोहळा शहरातील माळीवेस चौक, सुभाष रोड,



बसस्थानकमार्गे वारकरी दिंड्या, पताका, ध्वजकरी, विठू रायाचे नामस्मरण करीत कपिलधार येथील मंदिरात मुक्कामी जातात. यावेळी वारकर्यांना संकल्प युवा सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने बस स्थानक समोर हॉटेल अन्नपूर्णा येथे फराळाचे वाटप करण्याची परंपरा गेल्या १० वर्षी पासुन अवितरपणे चालू आहे. याहीवर्षी शिवाजीनगर पोलिस निरीक्षक श्री. किशोर पवार साहेब यांच्या हस्ते पुजा करून अल्पोपहार वाटप करण्यात आला आहे, यावेळी पालखी सोहळ्याचे संस्थानप्रमुख ऍड. रविंद्र पाटील, दिंडीचे प्रमुख हरणे पाटील, महंत श्री. अमृताश्रम महाराज, पोलीस निरीक्षक श्री. पवार साहेब, किशनसिंग चौहान यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून आदरयुक्त सत्कार प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या हस्ते करण्यात आला. श्रीसंत मुक्ताईंच्या पालखीची महाआरती प्रतिष्ठानचे प्रमुख संतोष मेहता,प्रशांत डोरले, तिलक झाडीवाले यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकर्याला फराळ म्हणून केळी, चिवडा, राजगीरा लाडू, चिप्स असे विविध फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी शहरातील नागरिक व सर्व व्यापारी सह प्रतिष्ठानचे सदस्य कृष्णा जाधव, बाबासाहेब वणवे, रवी देवकर, करण पाबळे, जयराज जाधव, हर्षवर्धन पाटील, प्रवीण मते, आदित्य नवले, वैभव काळे, श्रेय जैन, यशराज जाधव, देवेश जैन सह अन्य सहकारी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## जागराण गोंधळ आंदोलन ; अन्यायाला वाचा फोडण्यासाठी - बाळासाहेब गायकवाड

# आजच्या न्याय हक्काच्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हा!

पाटोदा प्रतिनिधी पाटोदा तालुक्यातील प्रलंबित प्रश्न, शासकीय योजनांमधील अपयश, बोगस कामे आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने बुधवार, ता. २६ जून रोजी ङ्गजागरण गोंधळ आंदोलनफ छेडण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटोदा येथून सुरू होणारा हा मोर्चा तहसील कार्यालयावर धडकणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे आणि जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी होणार आहेत.पाटोदा तालुक्यातील विविध योजनेअंतर्गत झालेले भ्रष्टाचार अनियमित कामे राजकीय योजनेत अधिकाऱ्यांचं अपयश बोगस कामे विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जागरण गोंधळ आंदोलन आयोजित केले आहे या आंदोलनातून झोपेचं सोंग घेतलेल्या अधिकाऱ्यांना जागा करण्यासाठी आणि जनतेला त्यांच्या हक्काचे मिळून देण्यासाठी हे आंदोलन असणार आहे या आंदोलनात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी केले आहे..

आंदोलनाची पार्श्वभूमी आणि मागण्या

पाटोदा तालुक्यातील अनेक प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. शासकीय योजनांमधील भ्रष्टाचार, बोगस कामे आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे सामान्य जनता, विशेषतः गोरगरीब आणि दलित समाज त्रस्त आहे. या आंदोलनातून वंचित बहुजन आघाडीने खालील प्रमुख मागण्या मांडल्या आहेत:

१) जमिनींचे नियमितीकरण

पोटखराब झालेल्या जमिनींचे नियमितीकरण तातडीने करण्यात यावे.

२) बोगस रस्त्यांची चौकशी : शंभर



चिरा ते सरकारी दवाखाना, पाटोदा येथील बोगस रस्त्याची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत.

३) घरकुल योजनेतील भ्रष्टाचार : घरकुल योजनेत कॉन्ट्रॅक्ट भरतीच्या इंजिनिअरांकडून जिओ टॅगिंगसाठी गोरगरिबांकडून प्रत्येक हप्त्यासाठी २,००० रुपये घेतले जातात. या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि पैसे कुठे जातात याचा तपास करावा.

४) घरकुल योजनेचे हप्ते : प्रधानमंत्री आणि रमाई घरकुल योजनेचे हप्ते वेळेवर वितरित करावेत.

५) सामाजिक योजनांचे लाभ : संजय गांधी, श्रावण बाळ आणि निराधार योजनांच्या लाभार्थ्यांना मानधन वेळेवर मिळावे.

६) वाळू वितरण : घरकुल लाभार्थ्यांना शासकीय नियमानुसार ५ ब्रास वाळू विनामूल्य द्यावी.

७) बोगस कामांवर कारवाई : ग्रामसडक योजनेतील बोगस कामे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बोगस रस्त्यांची चौकशी करून दोषी अभियंते आणि ठेकेदारांवर कारवाई करावी.

८ ) पांदन रस्ते आणि बोगस विहिरी : पांदन रस्ते, बोगस विहिरी आणि दलित वस्तीतील कामांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी.

### आंदोलनाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष!

पाटोदा तालुक्यातील प्रलंबित प्रश्न आणि भ्रष्टाचाराविरोधात वंचित बहुजन आघाडीने पुकारलेले ङ्गजागरण गोंधळ आंदोलनफ हे सामान्य जनतेच्या हक्कांसाठी आणि प्रशासकीय पारदर्शकतेसाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. येत्या बुधवारी ता. २६ जून रोजी होणाऱ्या या आंदोलनाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**- अतुल शेलार**
**सामाजिक कार्यकर्ता कुसळंब.**

### सामाजिक प्रभाव

या आंदोलनामुळे तालुक्यातील भ्रष्टाचार आणि प्रशासकीय निष्क्रियतेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. विशेषतः गोरगरीब आणि दलित समाजाला शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणी आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे सामान्य जनतेत असंतोष आहे. वंचित बहुजन आघाडीच्या या आंदोलनामुळे या प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळण्याची शक्यता आहे.

### आंदोलनाचे स्वरूप

हे आंदोलन शांततामय पद्धतीने परंतु ठामपणे आयोजित करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू होणारा मोर्चा तहसील कार्यालयावर धडकणार असून, यावेळी तहसीलदारांना निवेदन सादर केले जाईल. आंदोलनात शेकडो कार्यकर्त्यांसह स्थानिक नागरिकांचाही सहभाग अपेक्षित आहे. वंचित बहुजन आघाडीने प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर या मागण्यांवर तातडीने कार्यवाही झाली नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष अजय सरवदे , उपाध्यक्ष सचिन मेगडंबर हे करत आहेत...

# संतोष गायकवाड यांची पोलिस उपनिरीक्षक पदी नियुक्ती.



प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे उरण दि २५ उरण पोलिस स्टेशन मध्ये कार्यरत असलेले संतोष गायकवाड यांची उरण शहराच्या पोलिस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याने पत्रकार उत्कर्ष समिती तर्फे अध्यक्ष अरुण चवरकार व पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.

संतोष गायकवाड यांनी काही वर्ष पनवेल ट्रॉफिक पोलिस म्हनून चांगली कामगिरी केल्याने वरिष्ठांनी ही कौतुक केले आहे.त्यानंतर क्राईम ब्रांच बेलापूर येथे अनेक वर्षे कौतुकास्पद कामगिरी करून पोलिस खात्यात आपल नाव लौकीक केलं. आजही परराज्यातून आरोपी शोधून आणायचे असेल तर संतोष गायकवाड यांच्यावर कामगीरी सोपवली जाते. आणि ते जबाबदारी पूर्ण करून दाखवतात असे उदगार सत्कार करताना उपस्थित उरणचे पोलिस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी पत्रकारांना सांगितले. संतोष गायकवाड यांच एक वैशिष्ट् त्यांनी अनाथ मुलींना दत्तक घेऊन शिक्षण देऊन लग्न लावून दिलं. या सत्कार प्रसंगी,ए पी आय खाडे,महेश भोईर, विकास गुरसाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यातील सर्व आमदार आणि खासदार कृषी विमा कंपनीवर मेहरबान - भाई विष्णुपंत घोलप



पाटोदा (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातील शेतकरी 2023 आणि 2024 सालातील खरीपाच्या विम्यापासून आजही वंचित आहे त्याला बीड जिल्ह्यातील सर्व आमदार आणि खासदार जबाबदार असुन भारतीय कृषी विमा कंपनीवर ते मेहरबान झालेले आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांना विमा मिळत नाही असे परखड मत भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना व्यक्तकेले. 2023 साली खरीपात पावसाच्या खंडामुळे आणि 2024 साली खरीपा सततच्या पावसामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची पीके वाया गेली. तात्कालीन परिस्थितीत कृषीमंत्री आणि शासनाने 25% आग्रीम विमा मंजुर केला त्यामधील काही शेतकऱ्यांना 2023 सालातील खरीपाचा विमा 25% मिळालाही परंतु राहिलेली रक्कम नेमकी किती? 2023 आणि 2024 सालातील खरीपाच्या कोणत्या पीकाला किती टक्के विमा मंजुर केला तो अद्याप पर्यंत का मिळाला नाही याला सर्वस्वी बीड जिल्ह्यातील सर्व आमदार आणि खासदार जबाबदार असुन ते भारतीय कृषी विमा कंपनीवर मेहरबान झालेले आहेत जर 2023 आणि 2024 सालातील खरीपाचा विमा तात्काळ मिळाली नाही तर शेतकऱ्यांना बरोबर घेऊन भारतीय शेतकरी कामगार पक्ष तिव्र आंदोलन करतील असे परखड मत आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना भाई विष्णुपंत घोलप यांनी व्यक्त केले.

# मानोऱ्यात वाढले अतिक्रमण, रस्त्यांवर वाहने!

प्रतिनिधी
मानोराः शहरातील अकोला-आर्णी राष्ट्रीय महामार्गावर आणि शहरातील मुख्य असलेल्या दिग्रस चौकात अतिक्रमण वाढले आहे. त्यातच या ठिकाणी अगदी रस्त्यावर दुचाकी, ऑटोरिक्षा उभ्या केल्या जातात. परिणामी वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने या ठिकाणी पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन वाट काढावी लागत आहे. शहर हे तालुक्याचे ठिकाण आहे. शहराच्या मध्यभागातूनच अकोला-आर्णी हा राष्ट्रीय महामार्ग जातो. शहरातून नागपूर यवतमाळ आणि अमरावती, अकोला या जिल्ह्यांकडे मोठ्या प्रमाणात औद्योगिक आणि प्रवासी वाहतूक सुरू असते. ही वाहतूक शहरातील मुख्य चौक असलेल्या दिग्रस चौकातून होते. राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या या चौकालाच कारंजा-मानोरा हा मार्गही जोडलेला आहे. त्यामुळे या चौकात वाहतूक व्यवस्था सुरळीत असणे अपेक्षित आहेत. प्रत्यक्षात या चौकात खासगी प्रवासी वाहने, ऑटोरिक्षा, दुचाकी वाटेल तेथे उभ्या असतात. शिवाय या चौकात व्यावसायिकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणही केले आहे. परिणामी एसटी बसेसइतर वाहनांना मार्ग काढणे कठीण जाते. त्यामुळे इतर वाहनचालकांना मार्ग काढताना कसरत करावी लागते. यातून एखाद्या वेळी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब लक्षात घेत या प्रकाराकडे शहर पोलिसांसह उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने लक्ष देऊन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करणे, तसेच नगरपंचायत प्रशासनाने रस्त्यालगतच्या अतिक्रमण हटवणे आवश्यक आहे. मानोरा शहरातील दिग्रस चौकात मुख्य बाजार पेठ आहे. या ठिकाणी विविध व्यापारी संकुले आणि प्रतिष्ठाणे आहेत. या ठिकाणी राष्ट्रीय महामार्गावर पादचाऱ्यांसाठी फूटपाथ तयार करण्यात आला आहे. प्रत्यक्षात फुटपाथ अतिक्रमणाच्या विळख्यात अडकला आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचा झेंडा फडकवा-माजी मंत्री सूर्यकांता पाटील

## स्वर्गीय नाईक साहेबांचे मतदारसंघात अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करुन मायबाप जनतेच्या सेवेसाठी मी सदैव तत्पर असेल-कपिल नाईक




नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ह्या नेत्याच्या निवडणूका नसून कार्यकर्त्यांची निवडणूक आहे कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागून लोकनेते दिवंगत माजी आमदार प्रदीप नाईक यांचे स्वप्न पूर्ण करावे असे भावनिक आवाहन माजी मंत्री सूर्यकांता पाटील यांनी गोकुंदा येथील राष्ट्रवादीच्या आयोजित बैठकीत केले. दिनांक २४- जून रोजी मंगळवारी कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर माजी मंत्री डॉ.माधवराव पाटील किन्हाळकर, जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, युवा नेते कपिल प्रदीप नाईक, महिला जिल्हाध्यक्ष प्रांजली रावणगावकर, सरचिटणीस डी.बी.जांभरुणकर, सुभाष गायकवाड, शिवकुमार देवकते, संगीता सूर्यवंशी, सुभाष रावणगावकर , विश्वंभर भोसीकर, तालुकाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड, नगराध्यक्ष फिरोज दोसांनी, सभापती गजानन मुंडे , समाधान जाधव,शिवाजी घोगरे, साजिद खान, अरुण आळणे,मधुकर राठोड, प्रवीण मॅकलवार, शिवराम जाधव, अनिल कऱ्हाळे, रामा उईके, राहुल नाईक, जाहिरोदीन खान, अजय कोवे, बालाजी बामणे, धनलाल पवार,ज्योतिबा गोणारकर यांची उपस्थिती होती.यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना माजी मंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर म्हणाले की,मोदी व फडणवीस सरकार फसवणूक करणारे सरकार आहे.शेतकऱ्याची कर्जमाफी करू म्हणून शेतकऱ्याला आश्वासन देणारे सरकार सत्तेत येऊन एक वर्ष पूर्ण होऊनही शेतकऱ्यांची कर्जमाफी केली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त करत केंद्र व राज्य सरकारचा खरपूस समाचार घेतला. जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर म्हणाले की ही निवडणूक नेत्याची नसून ग्राम पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची आहे तेव्हा कार्यकर्त्यांनी मतभेद बाजूला सारून कामाला लागावे आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत यशसंपादन करून लोकनेते दिवंगत माजी आमदार प्रदीप नाईक यांना खरी श्रद्धांजली अर्पण करावी असे आवाहन कार्यकर्त्यांना त्यांनी केले.यावेळी रिमझिम पावसात पण हजारोच्या संख्येने कार्यकर्ते व नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दुर्गादास राठोड यांनी केले तर उपस्थितांचे आभार अर्जित नाईक यांनी मानले शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# जुन्या पिढीचा इतिहास नवीन पिढीला दिशादर्शक – जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मान पत्र देऊन कार्याचा गौरव

# बीड जिल्ह्यातील कारावास भोगलेल्या ५७ ज्येष्ठांचा सन्मान





बीड, दि.२५ (जि.मा.का.):- लोकशाहीफ मूल्ये, अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी झटलेल्या सर्व जुन्या पिढीचा इतिहास नवीन पिढीला दिशादर्शक आहे. आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या सर्व ज्येष्ठांच्या पाठिशी शासन खंबीरपणे सोबत आहे. आपणास पात्र असलेल्या सर्व सेवा प्रशासनाकडून तत्परतेने देण्यात येतील, असा विश्वास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज उपस्थितांना दिला. जिल्हाधिकारी कार्यालयात आणीबाणीच्या काळात लोकशाहीकरिता लढा देताना सामाजिक व राजनैतिक कारणासाठी कारावास भोगलेल्या बीड जिल्ह्यातील ५७ जणांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्वाक्षरी असलेले सन्मान पत्र जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याहस्ते आज सन्मानपूर्वक देण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, कारावास भोगलेले विजयकुमार पालसिंगलकर आदींची मंचावर उपस्थिती होती. १९७५ ते १९७७ काळात लागू केलेल्या आणीबाणीच्या काळात भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी व मुल्याच्या जपणुकीसाठी अत्यंत कठोर परिस्थितीत निडरपणे उभे राहिलात. आपण हुकुमशाहीचा धाडसाने प्रतिकार करून, कारावास स्वीकारून स्वातंत्र्य अभिव्यक्ती आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी संघर्ष केला. देशाच्या लोकशाही परंपरेचे रक्षण करण्याच्या या लढ्यातील आपल्या योगदानाचा आम्ही अभिमानाने गौरव करीत आहोत. हे सन्मान पत्र आपल्या त्याग, धैर्य आणि दृढतेला सलाम करण्यासाठी आहे. आपण आपल्या कृतीतून विचारांतून आणि त्यागातून नव्या पिढीसमोर लोकशाही मुल्यांचा आदर्श ठेवला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन्मान पत्रात नमूद केले आहे. प्रातिनिधिक स्वरूपात श्री. पालसिंगलकर, कुसुम सरवदे, उद्धव नागरगोजे, नारायण पांडे, दिलीप सोनवळकर, श्रीमती संजीवनी जोगदंड यांना जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या हस्ते सन्मान पत्र देण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनी सन्मान पत्राचे वाचन केले. तसेच उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## अथांगासाठी...

आठवतो आजही तो क्षण,
ज्या दिवशी तुझ्या डोळ्यांत पाणी होतं –
ना रडत होतास, ना हसत होतास,
फक्त कुठेतरी हरवलेलं तुझं बालपण होतं...

मी वडील होतो, पण देव नव्हतो,
तरी तुझ्या प्रत्येक हुंदक्याशी लढत होतो,
तुझ्या दुखण्यानं माझ्या नसानसांवर
पसरलं होतं काळजीचं मळभ...

कधी डॉक्टरांचे शब्द सुरीसारखे वाटले,
कधी औषधांनीही उत्तर दिलं नाही,
आणि मी मात्र रोज देवाशी झगडलो –
“का रे माझ्या लेकराला ही वेदना दिलीस?”

अथांग... तुझं नावच सांगतं खोल काही,
पण वडिलाचं हृदय त्याहूनही खोल –
अश्रूंमध्ये बुडूनही,
मी तुझ्यासाठी खंबीर होतो, चळवळ होतो.

तुझ्या प्रत्येक श्वासावर नजर होती,
माझ्या प्रत्येक श्वासात तुझी आस होती.
“ठणठणीत बरा होऊ दे माझा मुलगा,”
हीच रोजची माझी प्रार्थना होती...

आज तू हसतोस, चालतोस, बोलतोस,
तर वाटतं – त्या वेदनेचा अर्थच तू ठरलास.
कारण तुझ्या त्रासातूनच मी खरा वडील झालो,
आणि तू माझा गुरू...
जीवनातला अथांग शिकवणारा!

कवी विजयस्वी

# आ.संदीप क्षीरसागरांची आमदार आपल्या गावी व दारी मोहीम नागरिकांसाठी दिलासादायक

बीड (प्रतिनिधी):- आ.संदीप क्षीरसागर यांनी मआमदार आपल्या गावी व दारीफ ही संकल्पना घेऊन बुधवारी (दि.२५) रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश, मांजरसुंबा आणि पाली पंचायत समिती गणांमधील नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी विशेष मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सहभागाने गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्यात आल्या.यावेळी सामाजिक कल्याणकारी योजनांचा लाभ थेट गावकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी श्रावण बाळ योजना आणि संजय गांधी निराधार योजनेची मंजूरी पत्रे ग्रामस्थांना वितरित करण्यात आली. या उपक्रमामुळे गावकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास मदत झाली असून, स्थानिक पातळीवर प्रशासकीय सहकार्य वाढल्याचे दिसून आले. आ.क्षीरसागर यांनी या मोहिमेद्वारे गावकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. हा उपक्रम ग्रामीण भागातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरला आहे. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह तहसील कार्यालयाचे सर्व अधिकारी, पंचायत समिती, महावितरण, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, लघुपाटबंधारे विभाग आदी प्रशासकीय विभागांचे अधिकारी व चौसाळा जिल्हा परिषद गटातील गावांमधील नागरिक उपस्थित होते.

# आदिवासी भागातील विकासात्मक दृष्टिकोन समोर ठेवून विद्यापीठ विविध उपक्रम सुरू करत आहे -आमदार भीमराव केराम

## आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना उद्योग, कला,साहित्य संशोधन यावरभर देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील -कुलगुरू डॉ.चासकर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
किनवट : आदिवासी भागातील विकासात्मक दृष्टिकोन समोर ठेवून येथील संस्कृती संवर्धनासाठी विद्यापीठ विविध उपक्रम सुरू करत आहे.शासन नक्कीच याला पाठबळ देईल.मी त्यासाठी पाठपुरावा करीन असा विश्वास आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केला.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र किनवट येथे दिनांक २१ जून रोजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार समितीची बैठक संपन्न झाली यावेळी आमदार भीमराव केराम बोलत होते.अनेक विकासात्मक योजना सुरू करण्यासाठी विद्यापीठ अध्ययन अध्यापना सोबतच अनेक उपक्रम सुरू करीत आहे.त्याच्या नियोजनासाठी ही बैठक घेण्यात आली.


पुढे बोलताना आमदार केराम म्हणाले बदलत्या काळानुसार बोलीभाषा मृत होत आहेत त्याचे संवर्धन व संशोधन होणे आवश्यक आहे.त्यासाठी मी सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे,मा. राज्यपाल महोदय यांची मुंबई येथे मी भेट घेतली त्यांचे सहकार्य आपल्याला नक्कीच लाभेल.असे त्यांनी शेवटी सांगितले.ग्रंथालय उभारणीसाठी दहा लाख रुपयाचा आमदार निधी आ.केराम यांनी घोषित केला. कै.उत्तमराव राठोड यांचे नाव या केंद्राला आहे.या भागाच्या विकासासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले तो दृष्टिकोन समोर ठेवून हे केंद्र अधिकाधिक लोकाभिमुख व्हावे यासाठी विद्यापीठ विविध उपक्रम सुरू करण्याचा प्रयत्न करीत आहे.या भागातील अभ्यासक व जाणकार यांचे सहकार्य विद्यापीठ घेईल,केंद्रात विद्यार्थी पूरक अभ्यासक्रमा व्यतिरिक्त काही महत्त्वाचे प्रकल्प डोळ्यासमोर ठेवून विविध प्रकल्प शासनाकडे पाठवून त्याचा प्रत्यक्ष लाभ या भागातील आदिवासी युवकांना करून देण्याचा प्रयत्न केला जाणार असून, या भागातील पर्यटन, वनोपजावर आधारित उद्योग, कला,साहित्य संशोधन यावर भर देत या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना अधिकाधिक आर्थिक बळकटी कशी प्राप्त करून घेता येईल यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील राहील असे अध्यक्षीय समारोप करताना कुलगुरू डॉ.चासकर यांनी सांगितले.बैठकीसाठी संशोधन केंद्राच्या सल्लागार समितीचे सदस्य डॉ अशोक बेलखोडे, प्रफुल्ल राठोड, नारायणराव सिडाम, गंगारेड्डी बैनमवार, विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ माधव पाटील, नवोपक्रम विभागाचे संचालक डॉ शैलेश वढेर, विद्यापीठ अंतर्गत गुणवत्ता विभागाचे प्रमुख डॉ सुरेंद्र रेड्डी प्राचार्य डॉ शिवराज बेंबरेकर यावेळी उपस्थित होते.प्रारंभी स्वामी रामानंद तीर्थ व उत्तमराव राठोड यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले आदिवासी क्रांतिकारकांचे चित्र प्रदर्शन व संगणक कक्ष यांचे उद्घाटन करण्यात आले.डॉ चासकर यांनी एम एस डब्ल्यू व बी एस डब्ल्यू अभ्यासक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. सामाजिक कार्यकर्ते गंगान्ना नेमानीवार, प्राचार्य डॉ आनंद भंडारे, प्रा. द्वारकाप्रसाद वायाळ, नकुल प्रफुल राठोड यांनी विविध समस्यांवर कुलगुरूंची चर्चा केली. केंद्राचे प्रभारी समन्वयक प्रो डॉ मार्तंड कुलकर्णी यांनी कार्य प्रस्ताविक करताना केंद्रात राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली .सह- समन्वयक डॉ. सुनील व्यवहारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ शिवाजी गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.डॉ योगेश अंबुलगेकर, प्रा प्रीती देवस्थळे, प्रा श्रीकांत दुधारे, प्रा. श्रीराम पवार , रमेश जकुलवार, राजीव जाधव, सुनील टेकाम, मुरलीधर पवार यांच्यासह विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या संख्येने होता.



# पालकमंत्री अजितदादांचा दुटप्पीपणा ; नियोजन निधी पुण्याला वाटप करून खर्चही झाला मात्र बीडकरांना डीपीसीच्या ५७५ कोटींचे निव्वळ गाजर दाखवले

## बीडला न्याय देता येत नसेल तर पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.२४ ) नियोजनाच्या निधीकडे राज्यातील सर्वच जिल्ह्यांच्या नजरा लागलेल्या असताना लाडकी बहिण योजनेमुळे राज्याच्या तिजोरीला चांगलाच फटका बसला असुन जिल्हा वार्षिक योजना अर्थातच डीपीसीला ३ महिन्यांपासून निधी देण्यात आलेला नाही. सर्वच जिल्ह्यांच्या वार्षिक योजनेच्या तिजोरीत खडखडाट असुन त्याचा परीणाम जिल्ह्यातील विकासकामांवर झाला आहे. बीडमध्ये महिनाभरापूर्वी अर्थमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी आढावा बैठक घेऊन चालु वर्षांतील सन २०२५-२६ या नव्या वर्षातील विकास कामांसाठी ५७५ कोटींच्या कामांची घोषणा केली. मात्र निधीअभावी अद्याप शासनाकडून एकही रुपयांचा निधी वर्ग झालेला नाही. त्यामुळे बीडकरांना केवळ ५७५ कोटींचे गाजर दाखवण्यात आले असल्याची प्रतिक्रिया उमटत असतानाच दुसरीकडे मात्र पुणे जिल्ह्याला नियोजनाच्या निधीतून ३ कोटी २० लाख रुपये वर्ग करून त्यातले १ कोटी १६ लाख रूपये खर्चही झाले आहेत. त्यामुळे पुणे आणि बीड दोन जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या अजितदादांचा दुटप्पीपणा त्यांच्या सारख्या माणसाला शोभत नसुन नाव मोठे आणि लक्षण खोटे या म्हणीप्रमाणे अजितदादांची वागणुक असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी दिली असुन बीडकरांना न्याय देता येत नसेल तर अजितदादांनी पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे.



सविस्तर माहितीस्तव जिल्ह्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका,नगरपंचायती, नावीन्यपूर्ण योजनांसाठी सर्व शासकीय विभागांना जिल्हा नियोजन समिती मार्फत निधी वितरित केला जातो.जिल्हा वार्षिक योजनेतून हा निधी खर्च होतो.सन २०२४-२५ या आर्थिक वर्ष अखेरपर्यंत जिल्ह्यासाठी शासनाकडुन आलेला सर्व मंजुर निधी समित्यांमार्फत खर्च करण्यात आला आहे.३१ मार्चला सर्व कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.त्यानंतर मात्र गेल्या ३ महिन्यात म्हणजेच सन २०२५-२६ या नव्या आर्थिक वर्षातील विकास कामांसाठी शासनाकडून १ रूपयाचाही निधी वर्ग झालेला नाही.त्यामुळे नियोजन समितीत कमालीची अशांतता आहे. नियोजनच्या निधीचा पहिला हप्ता अजित पवारांच्या पुण्यालाच बीडला दमडीही नाही ; बीडला न्याय देऊ शकत नसतील तर पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा:- डॉ.गणेश ढवळे अजितदादा पवार हे पुणे आणि बीड दोन जिल्ह्याचे पालकमंत्री असले तरी नियोजनच्या निधी वाटपात दुजाभाव केल्याचे दिसून येत आहे.पुणे जिल्ह्याला नियोजनच्या निधीतुन पहिला हप्ता ३ कोटी २० लाख वर्ग झालेला असुन त्यातले १ कोटी १६ लाख रूपये खर्चही झाले आहेत. अजितदादा पवार बीडचेही पालकमंत्री असले तरी बीडच्या खात्यावर शुन्यच अद्याप कायम असुन पुणे जिल्ह्याला नियोजन समितीच्या निधीचा ३ कोटी २० लाख रुपये वर्ग झालेला निधी तातडीच्या खरेदीसाठी होता असंही नाही तर नियोजन समिती सक्षमीकरण या हेडखाली त्यातील १ कोटी १६ लाख खर्चही झाले आहेत. याचवेळी बीड जिल्ह्यातील जलजीवन सारख्या महत्वाच्या योजनेतील ५०५ कामांचे तब्बल १३२ कोटी रुपये सुद्धा अजितदादा पवार वेळेवर देत नसल्याने जर अजितदादांना बीडला न्याय देता येत नसेल तर त्यांनी बीड पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# भावी नगराध्यक्ष फक्त सोशल मीडियावर षडयंत्रबाजी?

बीड (प्रतिनिधी) – बीड शहर सध्या मूलभूत सुविधांच्या अभावाने त्रस्त आहे. रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे, गटारांची सफाई नाही, पावसात साचलेल्या पाण्यामुळे घरांमध्ये पाणी घुसते, कचऱ्याचे ढीग जागोजागी दिसत आहेत, आणि नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. अशा परिस्थितीत जनतेच्या समस्या समजून घेण्याऐवजी, काही स्वयंघोषित ङ्गभावी नगराध्यक्षङ्ग मात्र एसी गाड्यांतून शहर फिरतात आणि सोशल मीडियावर मंत्र्यांसोबत फोटो टाकून स्वतः चा प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करतात.

जनतेच्या मनात प्रश्न उभा राहतो की, हे नेते खरोखरच शहराच्या विकासासाठी गंभीर आहेत का? की फक्त छायाचित्रांमध्ये झळकण्यापुरताच त्यांचा उद्देश आहे?



शहरातील अनेक भागांत साचलेलं पाणी, डासांचा प्रादुर्भाव, अपूर्ण विकासकामं, आणि अस्वच्छता हे चित्रं पाहून सामान्य नागरिक संतप्त आहेत. पण या ङ्गभावीङ्ग नगराध्यक्षांना शहरातील गल्लीबोळात फिरण्याची आणि नागरिकांचे हाल समजून घेण्याची तसदी सुद्धा वाटत नाही. त्यांच्या सोशल मीडियावरील चमकदार पोस्ट्स पाहिल्यावर असं वाटतं की बीडचं भविष्य त्यांनी आधीच आपल्या खिशात घातलं आहे!

ताजे उदाहरण घ्या – शहरात रोज फिरणारी घंटागाडी आठवड्यात एक दा आहे. अनेक भागांत कचराकुंडीच उपलब्ध नाही. नागरिकांना रस्त्यावर कचरा टाकावा लागत आहे. दिवसेंदिवस दुर्गंधी वाढत चालली आहे, पण हे तथाकथित नगराध्यक्ष केवळ पोस्ट आणि प्रायोजित जाहिरातींमधून लोकप्रतिनिधीअसल्याचा दावा करतात.

भावी नगराध्यक्ष बनण्यापूर्वी, शहराची खरी स्थिती समजून घ्या – सोशल मीडियाच्या बाहेरही एक शहर असतं!

नागरिकांच्या प्रतिक्रिया –

– बीडकर आता केवळ वचने, फोटोशूट्स आणि राजकीय नाटकांना कंटाळले आहेत. त्यांना पाहिजेत खरे कार्यकर्ते, जे मैदानात उतरतील, शहरातील प्रश्न समजून घेतील, आणि त्यावर ठोस उपाययोजना करतील. फक्त ङ्गभावी नगराध्यक्षङ्ग म्हणून गोंगाट करणाऱ्यांवर विश्वास ठेवण्याची वेळ आता संपली आहे.

फोटो टाकून काही होत नाही, रस्त्यावर या आणि आमच्या समस्या पाहा!ङ्ग – अशी भावना आज बीडकरांच्या मनात आहे. हे नेते फक्त फेसबुकवरच सक्रिय आहेत, पण बीडच्या गटारात पाय ठेवण्याची तयारी नाही, – एक स्थानिक युवक म्हणतो.

# सेवानिवृत्त फौजदार भगवानराव वडमारे यांचे अल्पशा आजाराने निधन



बीड /प्रतिनिधी सेवानिवृत्त फौजदार भगवानराव वडमारे यांचे अल्पशा आजाराने आज सकाळी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. शाहू फुले आंबेडकर चळवळ येथील प्रखर नेतृत्व तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा उभारणी संदर्भात महत्वपूर्ण संघर्ष भूमिका बजावली होती.त्यांच्या पार्थिवावर आज सकाळी ०८:०० वाजता भगवान बाबा येथे अंत्यविधी करण्यात येणार आहे.त्यांचे बंधू व परिवारातील बरेच नातेवाईक मु ंबई तसेच बाहेरगावी असल्याकारणाने उद्या सकाळी आठ वाजता अंत्यविधीचा वेळ ठेवण्यात आलेला आहे. त्यांच्या पश्चात ०५ मुली आणि ०४ मुले आणि नातवंडे आहेत.



बीड – श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे आजोबा ब्र. गोविंदपंत श्री समाधीक्षेत्र बीड येथून आज आषाढीवारी साठी दिंडी मार्गस्त झाली. तत्पूर्वी संस्थान च्या वतीने निमंत्रित शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ साहेब यांच्या हस्ते पालखीची पालखीचे पुजन करून आरती करण्यात आली. यावेळी जेष्ठ नागरिक भरत लोळगे, डॉ शिवप्रसाद चरखा, संजय हरणे, नवनाथ प्रभाळे, गणेश लोणकर सह भक्तगण मोठया संख्येने उपस्थित होता

# आमदार साहेब, महेदवीया दायरा कब्रस्तानचीही पुन्हा एकदा पाहणी करून संरक्षक भिंतींची अवस्था बघा – एस.एम.युसूफ़

बीड (प्रतिनिधी) – विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांनी खासबाग–मोमीनपुरा येथील नागरिकांचे हाल थांबविण्यासाठी बिंदुसरा नदीवर नियोजित पूल व्हावे याकरिता नुकतीच पुन्हा एकदा पाहणी केली. हा पूल निम णि व्हावा म्हणून सर्वप्रथम आवाज बुलंद करणारे आणि या पुलाच्या निर्माणासाठी लागोपाठ दोन वर्षे डुबकी लगाव आंदोलन करणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी या प्रश्नासोबतच मोमीनपुरा भागातच असलेल्या महेदवीया दायरा कब्रस्तान ची सुद्धा पुन्हा एकदा आमदार साहेबांनी पाहणी करून कब्रस्तानच्या संरक्षक भिंतींची अवस्था बघावी असे आवाहन ही केले आहे.





याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, यापूर्वी महेदवीया सम ाजाच्या आग्रहानंतर आमदार संदीप क्षीरसागर यांनी २३ जानेवारी २०२३ रोजी स्वतः जातीने येऊन महेदवीया दायरा कब्रस्तान ची पाहणी केली होती. पाहणी करताना कब्रस्तानची अवस्था, तुटलेल्या भिंती, तेथून कब्रस्तानात येणारी कुत्री, कबरींना नुकसान पोहोचवून कब्रस्तानची पवित्रता खराब होत असल्याचे पाहून आश्वासन दिले होते की, लवकरच म हेदवीया दायरा कब्रस्तानची संरक्षक भिंत आमदार फंडातून बांधून देतो. पाहणी दरम्यानच्या या आश्वासनाला आता अडीच वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटला आहे. मात्र अजूनही कब्रस्तानची संरक्षक भिंत बांधून देण्यात आली नाही. म्हणून आम दारांनी या प्रश्नाकडे जातीने लक्ष देत पुन्हा एकदा कब्रस्तानात येऊन पाहणी करून कब्रस्तानच्या संरक्षक भिंतींची अवस्था बघावी असे आवाहन महेदवीया समाजाचे सदस्य तथा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.

## विशेष प्रदर्शनाच्या माध्यमातून लोकशाही अबाधित ठेवण्याच्या लढ्याला उजाळा !

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते उद्घाटन

## आणीबाणीच्या काळातील घटनांवर आधारित प्रदर्शन जिल्हा परिषदेच्या प्रांगणात प्रदर्शनाचे आयोजन

बीड, दि.२५ प्रतिनिधी:- देशात २५ जून १९७५ रोजी लागू झालेल्या आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त जिल्हा परिषदेच्या प्रांगणात आयोजित विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनामध्ये आणीबाणीच्या काळातील आव्हानात्मक परिस्थितीत लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांना उजाळा देण्यात आला आहे.जिल्हा प्रशासन व बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान, अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंखे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील, उपजिल्हाधिकारी शैलेंद्र सूर्यवंशी, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ.श्याम टरके, जिल्हा परिषदेतील सर्व वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आदींची उपस्थिती होती.या प्रदर्शनाच्या माध्यमातून नव्या पिढीला त्या काळातील घटनांचा इतिहास आणि लोकशाहीच्या संरक्षणाचे महत्त्व समजण्यास मदत होणार असल्याचे मत जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी व्यक्त केले. याबरोबरच शालेय विद्यार्थ्यांसह सर्वांनीच या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री. जॉन्सन यांनी केले.आणीबाणीच्या ५० व्या वर्षपूर्तीनिमित्त हे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनात आणीबाणीच्या काळातील महत्त्वाच्या घटना आणि लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी केलेल्या संघर्षाचा इतिहास चित्रांच्या माध्यमातून मांडण्यात आला आहे. आणीबाणीशी संबंधित विविध घटना, घडाम ोडी, त्या काळात लोकशाहीसाठी लढणाऱ्या मान्यवरांची छायाचित्रे, तसेच संक्षिप्त पण माहितीपूर्ण मजकूर आणि माहिती फलकांचा समावेश आहे.या प्रदर्शनात आणीबाणीच्या कालावधीतील संपूर्ण संघर्षाचा संक्षिप्त परिचय आणि त्यातील महत्त्वाचे टप्पे यांची मांडणी करण्यात आली आहे. माहितीपूर्ण मजकूर आणि ऐतिहासिक छायाचित्रांमुळे नागरिकांना त्या काळातील आव्हानात्मक परिस्थिती आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती मिळेल. हे प्रदर्शन सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. मान्यवरांचे स्वागत डॉ. टरके यांनी लोकराज्य मासिक व पुष्पगुच्छ देऊन केले.





This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com